# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः16.01.2026** **वारःशुक्रवार**

---

1. स्टार्टअप संकल्पनेच्या दशकपूर्तीनिमित्त आज नवी दिल्ली इथं पंतप्रधानांच्या उपस्थितीत विशेष कार्यक्रम
2. पंतप्रधान आज नव्या स्लीपर कोच वंदे भारत रेल्वेगाड्यांना हिरवा झेंडा दाखविणार
3. महाराष्ट्रात 29 महानगरपालिकांच्या निवडणुकीची आज मतमोजणी
4. मतदार याद्या पुनरीक्षण कार्यक्रमाला 19 तारखेपर्यंत मुदतवाढ आणि
5. 19 वर्षांखालील विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारतीय संघाची विजयी सलामी

**<u>मोदी</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नवी दिल्लीमधील भारत मंडपम इथं स्टार्ट अप महोत्सवाचं उद्घाटन होणार आहे. स्टार्ट अप संकल्पना कार्यान्वित झाल्याच्या दशकपूर्तीनिमित्त या विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. 2016 मध्ये आजच्याच दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून देशात स्टार्ट अप अस्तित्वात आले. नवोन्मेषाला चालना, औद्योगीकता वाढीसाठीचे माध्यम आणि विवेकाधारीत विकास या त्रिसूत्रीला समोर ठेवून ही योजना कार्यान्वित करण्यात आली होती. आजमितीला औद्योगिक क्षेत्रात स्टार्ट अपनं महत्त्वपूर्ण योगदान दिलं असून देशात दोन लाखांहून अधिक स्टार्टअप यशस्वीरीत्या काम करत आहेत. भारतीय अर्थव्यवस्थेचा तो मोठा आधारस्तंभ ठरला असून लवकरच देशाच्या ट्रीलियन अर्थव्यवस्थेचा टप्पा गाठण्यास सहाय्यभूत ठरणार आहे, असा विश्वास या क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.

**<u>वंदेभारत</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज हावडा, पश्चिम बंगाल आणि आसाममधील कामाख्या या स्थळांना जोडणाऱ्या नव्यानं तयार केलेल्या वंदे भारत स्लीपर एक्सप्रेससह अनेक नवीन गाड्यांना हिरवा झेंडा दाखवणार आहेत. आज उद्घाटन होणाऱ्या इतर गाड्यांमध्ये न्यू जलपैगुडी-नागरकॉइल अमृत भारत एक्सप्रेस, न्यू जलपैगुडी-तिरुचिरापल्ली अमृत भारत एक्सप्रेस, अलीपुरद्वार-एसएमबीटी बेंगळुरू अमृत भारत एक्सप्रेस, अलीपुरद्वार-मुंबई (पनवेल) अमृत भारत एक्सप्रेस, राधिकापूर-एसएमबीटी बेंगळुरू मेल एक्सप्रेस आणि बालुरघाट-एसएमबीटी बेंगळुरू मेल एक्सप्रेस यांचा समावेश आहे. यामुळे पश्चिम बंगाल, आसाम, बिहार, ओडिशा, आंध्र प्रदेश, कर्नाटक, तमिळनाडू, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश यांच्यातील प्रवासी संपर्क सुधारण्यास मदत होणार आहे.

येत्या रविवारी पंतप्रधान हावडा-आनंद विहार टर्मिनल अमृत भारत एक्सप्रेस, सियालदह-वाराणसी अमृत भारत एक्सप्रेस आणि संत्रागाची-तांबरम अमृत भारत एक्सप्रेस या गाड्यांना हिरवा झेंडा दाखवून रवाना करणार आहेत. या गाड्या सुरू झाल्यामुळे प्रवासी कमी वेळेत त्यांच्या गंतव्यस्थानावर पोहोचू शकतील. दरम्यान, या उपक्रमांमुळे आसाममधील कामरूप, बोंगाईगाव आणि पश्चिम बंगालमधील कूचबिहार, जलपाईगुडी, मालदा, मुर्शिदाबाद, पूर्वा वर्धमान, हुगळी आणि हावडा या जिल्ह्यांमध्ये वाणिज्य, पर्यटन आणि सामाजिक-आर्थिक विकासालाही चालना मिळणार आहे.

**मतमोजणी**

महाराष्ट्रात काल मतदान झालेल्या 29 महानगरपालिका निवडणुकीची मतमोजणी आज होणार आहे. त्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज करण्यात आल्या आहेत. मुंबईत आज सकाळी 10 वाजल्यापासून 23 कक्षात मतमोजणी सुरू होईल. यासाठी सुरक्षा व्यवस्था, वाहतूक नियोजन तसंच कायदा आणि सुव्यवस्था याबाबत आवश्यक ती दक्षता घेण्यात आली आहे. पुण्यातही महापालिका प्रशासनाने मतमोजणीसाठी जय्यत तयारी केली असून 30 हजार कर्मचारी ही प्रक्रिया पार पाडणार आहेत. शहरात 15 ठिकाणी मतमोजणी होणार आहे. पिंपरी चिंचवडमध्ये 8 ठिकाणी मतमोजणी होणार आहे. ईव्हीएमच्या सुरक्षित वाहतुकीसाठी पोलीस प्रशासन, वाहतूक विभाग तसंच संबंधित यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. जवळपास 11 हजार कर्मचारी मतमोजणी प्रक्रियेत सहभागी होणार आहेत.

**मतदान**

दरम्यान, या महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी काल काही किरकोळ अपवाद वगळता शांततेत मतदान पार पडलं. राज्यभरातल्या एकंदर मतदानाची अधिकृत आकडेवारी अद्याप जाहीर करण्यात आली नाही; पण साधारण 55 ते साठ टक्के मतदान झाल्याचा अंदाज आहे.

**जिप निवडणूक**

महाराष्ट्रातल्या 12 जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी आजपासून अर्ज भरायला सुरुवात होणार आहे. या टप्प्यात पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव, लातूर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या 12 जिल्हा परिषदांच्या आणि त्या जिल्ह्यातल्या पंचायत समित्यांसाठी निवडणुका होणार आहेत.

**एसआयआर मुदतवाढ**

केंद्रीय निवडणूक आयोगानं गोवा, लक्षद्वीप, राजस्थान, पुदुचेरी आणि पश्चिम बंगालमध्ये सध्या सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या गहन पुनरीक्षण कार्यक्रमाची अर्थात एसआयआरची मुदत येत्या 19 तारखेपर्यंत वाढवली आहे. यामुळे मतदारांना 19 जानेवारीपर्यंत आपले दावे आणि हरकती दाखल करता येऊ शकतील. निवडणूक आयोगानं यासंदर्भात संबंधित राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना पत्र पाठवलं आहे. संबंधित मुख्यकार्यकारी अधिकारी आणि अन्य घटकांनी केलेल्या विनंत्या विचारात घेऊन एसआयआरचं वेळापत्रकात बदल केल्याचं या पत्रात म्हटलं असून दावे आणि हरकती दाखल करण्याच्या मुदतीत वाढ केल्याच्या निर्णयास व्यापक प्रसिद्धी द्यावी, अशा सूचनाही संबंधित सीईओंना देण्यात आल्या आहेत.

**प्रजासत्ताक दिन**

77 व्या प्रजासत्ताक दिन सोहळ्याचे प्रमुख पाहुणे म्हणून युरोपीय कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कॉस्टा आणि युरोपीय कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन देर लेयेन उपस्थित राहणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेलं आमंत्रण स्वीकारुन हे दोघे 3 दिवसांच्या भारत भेटीवर येणार आहेत. या दौऱ्यात ते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटून द्विपक्षीय चर्चा करतील. 27 जानेवारीला आयोजित भारत युरोपीय संघ शिखर परिषदेचं अध्यक्षपदही ते संयुक्तपणे भूषवतील.

**ऊर्जा परिषद**

'भारत 2014 मध्ये 249 गिगावॅट ऊर्जानिर्मिती करत होता. ती आता 2025 मध्ये 510 गिगावॅटपेक्षा जास्त म्हणजे जवळ जवळ दुप्पट झाली आहे', अशी माहिती केंद्रीय ऊर्जामंत्री मनोहर लाल यांनी दिली आहे. नवी दिल्ली इथं

राष्ट्रीय विद्युत शिखर परिषद 2026 च्या उद्घाटन समारंभात ते काल बोलत होते. भारताने विश्वासार्हता, सुलभता आणि लवचिकता याद्वारे ऊर्जा विपुलतेच्या एका नवीन युगात प्रवेश केला आहे. भारत आता जगातील तिसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा वीज उत्पादक आणि ग्राहक आहे, असंही ते म्हणाले. देशाची जीवाश्म इंधन नसलेली क्षमता 2014 मध्ये 32 टक्क्यांवरून आता 2025 मध्ये 52 टक्क्यांपर्यंत वाढली आहे, त्यामुळे भारतानं ऊर्जा संक्रमणात जागतिक नेतृत्व करणाऱ्या देशांच्या यादीत स्थान मिळवलं आहे, असंही त्यांनी सांगितलं. ही परिषद चार दिवस चालणार आहे.

**सोरेन**

झारखंडमध्ये रांची जमीन घोटाळा प्रकरणात मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी ईडीच्या समन्सचं उल्लंघन केल्याप्रकरणी खटला पुढे चालू ठेवण्याची परवानगी उच्च न्यायालयाने दिली. जमीन घोटाळ्याच्या चौकशीसाठी समन्स बजावूनही सोरेन हजर राहिले नाहीत, असा आरोप करत ईडीने तक्रार दाखल केल्यानंतर विशेष न्यायालयाने कार्यवाही सुरू केली होती.

**शरणागती**

छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात काल 52 माओवाद्यांनी  सुरक्षा दलासमोर शरणागती पत्करली. यामध्ये 21 महिलांचा समावेश असून त्यांच्यावर एकूण एक कोटी 45 लाख रुपयांची बक्षिसं होती. हे सर्व माओवादी भैरमगड परिसरात कार्यरत होते. सरकारी पुर्नवसन योजनेनुसार शरण आलेल्या प्रत्येक माओवाद्यांना प्रत्येकी पन्नास हजार रुपयाचं अर्थसहाय्य देण्यात येणार आहे.

**हज मुदत वाढ**

परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं हज यात्रेकरूंना नियमांची पूर्तता करण्यासाठी 25 जानेवारीपर्यंत मुदतवाढ दिली आहे. यावर्षी यात्रेकरूंसाठी ही मुदत अंतिम असून यानंतर कुठल्याही परिस्थितीत ती पुन्हा वाढवली जाणार नाही असंही मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे. वाढवलेल्या मुदतीत यात्रेकरुनी आपल्या प्रवासासाठी नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावी, आपली पारपत्रं भारतीय हज समितीकडे किंवा संबंधित यात्रा आयोजकांकडे दाखल करावीत असे निर्देशही मंत्रालयानं दिले आहेत.

**क्रिकेट**

19 वर्षांखालील विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत काल भारतीय संघानं अमेरिकेवर 6 गडी राखून मात करत विजयी सलामी दिली. पावसाचा व्यत्यय आल्याने डकवर्थ लुईस नियमाप्रमाणे सामना झाला. प्रथम फलंदाजी करताना अमेरिकेनं 36 षटकांत केवळ 107 धावा केल्या, त्यानंतर पावसामुळे भारताला 37 षटकांमध्ये 96 धावांचं आव्हान देण्यात आलं. हे आव्हान भारतीय संघानं सहज पार केलं. 16 धावा देत अमेरिकेचे 5 गडी बाद करणारा हेनिल पटेल सामनावीर ठरला. या स्पर्धेतला भारताचा पुढचा सामना उद्या बांग्लादेश संघाशी होणार आहे.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं,

## नमस्कार.